Rotary 2020-2021

# southern star ...अवघे धरू सुपंथ

The official bulletin of Rotary Club of Pune South

Year : 51, Vol : 10, April 2021

**LIFE IS**
**A LONG JOURNEY**
**BETWEEN**
**HUMAN BEING**
**&**
**BEING HUMAN....**

**President :** Rtn. Sudarshan Natu | **Secretary :** Rtn. Manisha Belgaonkar | **Editor :** Rtn. Yogesh Nandurkar

## *Rotary April Maternal and Child Health Month*

Rtn. Abhijit Deshpande (AB)

*"If mothers are empowered and healthy, so are their families, leading to an alleviation of poverty and hunger."*
*- Robert Zinser, co-founder of the Rotarian Action Group for Population and Development and retired president for Asia at chemical giant BASF*

An estimated 5.9 million children under the age of five die each year because of malnutrition, inadequate health care, and poor sanitation. Every day hundreds of mothers risk their lives giving birth.

All of this can be prevented and Rotary Clubs are working round the clock towards this. Rotary provides immunizations and antibiotics to babies, improves access to essential medical services, and supports trained health care providers for mothers and their children. Members provide education, birth kits, and mobile health clinics. Women are taught how to prevent mother-to-infant HIV transmission, how to breastfeed, and how to protect themselves and their children from disease.

**Encourage your** friends, relatives, neighbours, and business associates to:

Join Rotary and help save mothers and children. AND TO

Give Now to support maternal and child health.

Enjoy Watching....

- रोटरीनं प्रत्येक महिना विशिष्ट कामासाठी योजला आहे. त्याबद्दल महत्त्व आणि काय करायचं हे सांगणारं पान
- शिवाय रोटरी इंटरनॅशनलबद्दल काही विशेष

रोटरी

तुमचा लेख आवर्जून द्या..
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

# रश्मी उवाच

रो. डीजी रश्मी कुलकर्णी



९ मार्च २०२१

ऐकण्यासाठी क्लीक करा...

२ मार्च २०२१

ऐकण्यासाठी क्लीक करा...

- आपला क्लब रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मध्ये येतो.
- डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रश्मी कुलकर्णी यांचा संवाद
- या डिस्ट्रिक्टमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम
- डिस्ट्रिक्टमधील क्लब्सचे महत्त्वाचे, दखलपात्र असे प्रोजेक्ट्स

डिस्ट्रिक्ट कनेक्ट

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

# मंतरलेलं बन - सुंदरबन

**व्याख्याते - रो. सौ.मृदुला घोडके**
**आणि रो. सौ.माधुरी किरपेकर**

दिनांक - १ मार्च २०२१



जगातल्या सर्वांत व्यापक आणि मोठया खारफुटीच्या जंगलात नुकतीच सफर करून आलेल्या रो.सौ.मृदुला घोडके आणि रो.सौ.माधुरी किरपेकर यांनी एक मार्चला साप्ताहिक सभेत ''मंतरलेले बन - सुंदरबन'' या कार्यक्रमात सफरीत आलेले रोमांचक अनुभव सांगितले. कार्यक्रमात सुरुवातीला रो.प्रे.सुदर्शन नातू यांनी सर्वांचं स्वागत केलं.

पेंचच्या जंगलात सफारी करताना जंगल वाचायला आणि ऐकायला शिकले त्यामुळं पुढे सुंदरबनला जावं असं वाटायला लागलं असं रो.सौ.मृदुला घोडके यांनी अनुभवकथनाच्या सुरुवातीला सांगितलं. चार हजार दोनशे चौसष्ट चौरस किलोमीटरच्या क्षेत्रांत पसरलेलं आणि गंगा, ब्रह्मपुत्रा, मेघना आणि पद्मा या नद्यांच्या त्रिभूज प्रदेशात वसलेलं सुंदरबन जंगल म्हणजे निसर्गाची किमयाच आहे. सुंदरी नावाच्या झाडांवरून या प्रदेशाला सुंदरबन हे नाव पडलं आहे. या त्रिभूज प्रदेशाचा साठ टक्के भाग बांगलादेशात आहे तर चाळीस टक्के भाग भारतात आहे. सुंदरबनात एकूण एकशेदोन बेटं आहेत त्यांपैकी चौपन्न बेटांवर मानववस्ती आहे. १९९७ साली युनेस्कोनं सुंदरबनला 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून घोषीत केलं होतं. इस्टुरिअन जंगल म्हणजे खारफुटीचं जंगल... खाडीचा प्रदेश ज्यात भरती ओहोटी येते असं नदीचं रुंद मुख आणि त्यात उगवणाऱ्या वनस्पतींनी तयार होणारं जंगल म्हणजे खारफुटीचं जंगल किंवा इस्टुरिअन जंगल होय. सुमारे सत्तर टक्के भाग पाण्यानं व्यापलेला आहे. सुंदरबन हे जगातलं सगळ्यांत मोठं इस्टुरिअन जंगल आहे. या जंगलात विविध प्रकारची मुळं असलेली झाडं आढळतात. हा दलदलीचा खारफुटीचा प्रदेश असल्यामुळं माती भुसभुशीत, बारीक असते, जी वनस्पती वाढीसाठी पोषक नसते. ब्रीदींग रुट्स म्हणजे त्या झाडांची मुळं जमिनीवर येऊन श्वास घेतात. स्टील्ट रुट्स म्हणजे त्या झाडांची मुळं झाडाला आधार देण्यासाठी सरळ खाली येतात आणि आधार

देतात. स्नेक लाईक रुट्स म्हणजे त्या झाडांची मुळं सापांसारखी एकमेकांत गुंतलेली असतात त्यामुळं जमिनीतली माती घट्ट धरून ठेवली जाते. जैवविविधतेनं नटलेल्या सुंदरबनात विविध प्रकारचे पक्षी आढळतात. फक्त किंगफिशर या पक्षाचे बारा प्रकार सुंदरबनात आहेत. कॉमन सॅन्ड पायपर, इगरेट, लांब चोचीचा युरेजिअन कर्लू, शीळ घालणारं व्हिजलींग टील, एक मोठ्या दाताचा फिडलर क्रॅब, आपल्या बचावासाठी चिकट, काडीसारखा, विषारी पदार्थ पाण्यात सोडणारा जेली फिश, शिक्रा, मड पायपर असे विविधप्रकारचे मासे आणि पक्षी बघितल्याचं दोघींनी सांगितलं. सुंदरबनात इतर वन्य प्राणीसुद्धा आहेत. खाऱ्या पाण्यातल्या मगरी, जंगली डुक्करं, ठिपक्याची हरणं, बेंगाल टायगर हे प्राणी प्रामुख्यानं आढळतात.

सुंदरबनात रो.सौ.मृदुला आणि रो.सौ.माधुरी यांनी लोककथेवर आधारीत लोकनाट्याचा आनंदही घेतला. 'दक्षिणराय' म्हणजे वाघ आणि बनबेबी म्हणजे देवी. या दोघांची स्थानिक लोक पूजा करतात. लाकूडतोड, मासेमारी आणि मध गोळा करणं हे तिथले स्थानिक व्यवसाय आहेत. तिथं बऱ्याच कामात वापरली जाणारी, पाण्याच्या पंपावर चालणारी जुगाड गाडी बघायला मिळते, मात्र बाकी वेळेला किंवा पर्यटकांना फिरण्यासाठी बोटीचाच वापर करावा लागतो. कुठेही पाण्यात उतरायची परवानगी नसते कारण तसं करणं धोकादायक असतं. सुंदरबनात फिरण्यासाठी तीन दिवस लागतात. रोज सकाळी सात ते संध्याकाळी चार वाजेपर्यंत फिरता येतं. अशा या रंजक आणि रोचक कार्यक्रमाची सांगता रो. रश्मी परुळकर यांच्या आभार प्रदर्शनानं झाली.

**व्हिडिओ इथे पाहा...**

## कथांमागील कथा

**व्याख्याती – पूर्वा पालेकर**


दिनांक – ८ मार्च २०२१

आठ मार्चला झालेल्या साप्ताहिक सभेत पूर्वा पालेकर यांचं व्याख्यान झालं. ॲनेट मृण्मयी पूर्णपात्रे यांनी पूर्वा पालेकर यांचं स्वागत केलं. त्यांची ओळख करून देताना ॲनेट मृण्मयी पूर्णपात्रे म्हणाल्या की, पूर्वा पालेकर या भारतीय विद्या आणि संस्कृत भाषा या विषयांची विद्यार्थिनी असून त्यांनी एमए भारतीय विद्या पारंगत (इंडोलॉजी) आणि एमए वेद (संस्कृत) या पदव्या प्राप्त केल्या आहेत. भारतीय विद्या आणि संस्कृत भाषा यांसारख्या विषयांचा दर्जेदार अभ्यास आणि संशोधन भारतात सातत्यानं सुरू राहावं आणि वाढत जावं यांसाठी पूर्वा पालेकर यांना भविष्यात काम करण्याची इच्छा आहे.

लहानपणापासून आपण सगळेजण अनेक ऐतिहासिक आणि पौराणिक कथा ऐकतो. दीर्घ प्रवास करून या कथा आपल्यापर्यंत पोहोचलेल्या असतात आणि काळाच्या ओघात त्यांमध्ये अनेक बदल घडलेले असतात. या कथांची मूळ बीजं आणि झालेली विविध संस्करणं म्हणजेच या कथांमागच्या संपूर्ण कथा मात्र आपल्याला माहीत नसतात. काळाच्या ओघात मूळ कथेत बदल होऊन, त्यावर संस्करणं होत आपल्यापर्यंत मूळ कथेचा काही भागच पोहोचतो. मत्स, कुर्म वराह, नरसिंह, वामन हे विष्णू अवतार सर्वश्रुत आहेत. शतपथ ब्राह्मण ग्रंथात मत्स




अवताराबद्दल सांगितलं आहे. महाभारत ग्रंथात ब्रह्मदेव मनूला वाचवतो आणि सात ऋषी, धनधान्य घेऊन मनू नवी सृष्टी निर्माण करतो. पुराणातही अशा समान कथा आढळतात. महाभारतात कुर्म अवतार विष्णू अवताराशी जोडला आहे. समुद्रमंथनाची कथा यात सांगितली आहे. वराह अवताराची कथा महाभारतात विष्णूशी जोडली आहे. तैत्तरीयसंहिता ग्रंथात प्रजापती पृथ्वी सपाट करतो. रामायणात ब्रह्मदेव पृथ्वीला बुडण्यापासून वाचवतो. वराह अवताराच्या अशा विविध कथा आढळतात. पुराणात हिरण्यकश्यपू आणि प्रल्हाद या कथेत नरसिंह अवतार आढळतो. ऋग्वेद आणि शतपथब्राह्मण ग्रंथात विष्णू म्हणजेच त्रिविक्रम तीन पावलांत ब्रह्मांड व्यापतो अशी वामन अवताराची कथा येते. पुराणात विष्णू तीन पावलांत ब्रह्मांड व्यापतो आणि बळीराजाचा संहार करतो अशी कथा येते.




महाभारताबद्दल बोलताना पूर्वा पालेकरांनी पुढे सांगितलं की, महाभारतात वेळोवेळी मोठ्या प्रमाणात उपकथानकांची भर पडलेली दिसते. द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग विस्तृतपणे विषद करून आपला हा मुद्दा त्यांनी समजावून सांगितला. त्याचप्रमाणं दुष्यंत शकुंतला या कथेबद्दलही त्यांनी वेगवेगळ्या गोष्टी, वेगवेगळ्या ग्रंथांतले पुरावे देऊन समजावून सांगितल्या. विष्णू अवतारकथा, दुष्यंत शकुंतला यांची प्रेमकथा आणि महाभारतातल्या कथांबद्दल या व्याख्यानात पूर्वा पालेकरांनी महत्त्वपूर्ण पण रंजक माहिती दिली.

**व्हिडिओ इथे पाहा...**

## सर्वेश्वरा

### निर्मिती – टीम सहयोगी

दिनांक – १५ मार्च २०२१




ज्येष्ठ कवी सुधीर मोघे यांच्या स्मृतिदिनी १५ मार्चला 'सहयोगी' तर्फे 'सर्वेश्वरा' हा गाणी, गप्पा आणि वाचन असा कार्यक्रम सादर करण्यात आला. सहयोगीचे मार्गदर्शक श्री. योगेश नांदुरकर आणि कादंबरी सहस्रबुद्धे यांनी कार्यक्रमाची रुपरेषा सांगितली. कार्यक्रमाची सुरुवात सुधीरजींच्या आणि सुधीरजींनीच गायलेल्या 'सर्वेश्वरा शिवसुंदरा' या अप्रतिम गीताच्या चित्रफितीनं झाली. अनेक दुर्मिळ चित्रफितींतून त्यांच्या आठवणी जागवण्यात आल्या. सुरेश भट लिखित 'मग माझा जीव' हे सुधीरजींनी स्वरबद्ध केलेलं गाणं सौ. धनश्री कुलकर्णी यांनी सादर केलं. तृप्ती कुलकर्णी यांनी 'लय' या काव्य संग्रहातील काही निवडक रचनांचं अभिवाचन केलं.

'अरे आला कवी आला... धावा धावा लपा लपा...' या उपहासात्मक काव्याचा उल्लेख तसंच 'झेंडूची फुले' या अत्र्यांच्या नाटकातल्या कवीबद्दलचं उपहासात्मक भाष्य यांमुळे आपण कवी कधीच व्हायचं नाही असं ठरवलं होतं हे सुधीरजींनी एका कार्यक्रमात सांगितलं होतं. त्याचीही गंमतीशीर आठवण या निमित्तानं जागी झाली. 'कविता पानोपानी' या त्यांच्या प्रसिद्ध कार्यक्रमात 'शब्दधून' या कविता संग्रहातल्या काही नितांतसुंदर रचना तसंच इतरही काही कविता सुधीरजींनी सादर केल्या होत्या त्यांच्याही चित्रफिती सादर करण्यात आल्या.



'झुलतो बाई रास झुला' तसंच 'दयाघना' या गीतांच्या आणि 'स्वतंत्रते भगवती' या काव्यसंग्रहाच्या निर्मितीच्या सुधीरजींनी सांगितलेल्या कथांच्या

चित्रफितीदेखील प्रेक्षकांना पाहायला मिळाल्या. ‘एक झोका चुके काळजाचा ठोका’, ‘अरुपास पाहे रुपी’, ‘मन मनास उमगत नाही’, ‘मना तुझे मनोगत मला कधी कळेल का?’, ‘माझे मन तुझे झाले’ अशी सुधीरजींची अनेक प्रसिद्ध गाणी सौ. धनश्री कुलकर्णी यांनी सादर केली. ‘सखी मंद झाल्या तारका’, ‘समिंदरा माझ्या समिंदरा माझ्या’, ‘वन्दे मातरम’ अशा सुधीरजींनी सादर केलेल्या उत्तमोत्तम गीतांच्या चित्रफिती रसिकांना पाहायला मिळाल्या. तृप्ती कुलकर्णी यांनी सुधीरजींच्या लय, पक्षांचे ठसे, स्वतंत्रते भगवती, कविता सखी, निरंकुशाची रोजनीशी, आत्मरंग, अनुबंध, गाणारी वाट, या पुस्तकांमधल्या कविता आणि उताऱ्यांचं अभिवाचन केलं.

उत्तरोउत्तर रंगत गेलेल्या या कार्यक्रमात सगळे रसिकजन गुंगून गेले होते. ‘सहयोगी’च्या टीमने सुधीरजींच्या ‘शब्दधून’ या कवितासंग्रहाचं इबुक तयार करून या प्रसंगी त्याचं प्रकाशन केलं आणि सुधीरजींना एक आगळीवेगळी आदरांजली वाहिली. या कार्यक्रमात शेवटी रो.आनंद कुलकर्णी यांनी ‘सहयोगी’च्या टीमचे आणि सर्वांचे आभार मानले.

**व्हिडिओ इथे पाहा...**

## नादयोग


**व्याख्याती – सौ. स्मिता सोवनी**

दिनांक – २२ मार्च २०२१

२२ मार्चला झूम मिटींगद्वारे साप्ताहिक सभा संपन्न झाली. ‘नादयोग’ या विषयावर सौ. स्मिता सोवनी यांचं व्याख्यान झालं. फायनान्समधल्या पीएचडीधारक, संगीत विशारद, सिल्व्हा माइंड कट्रोल या प्रणालीत प्राविण्य मिळवलेल्या आणि सर्टिफाईड स्ट्रेस मॅनॅजमेंट प्रोफेशनल म्हणून कार्यरत असणाऱ्या तसंच नादयोग या विषयावर वेगवेगळ्या शैक्षणिक संस्था, इंडिअन आर्मी आणि विविध आस्थापनांमध्ये व्याख्यान देणाऱ्या अशा बहुआयामी सौ. स्मिता सोवनी यांचं स्वागत या कार्यक्रमाचे समन्वयक रो. आनंद कुलकर्णी यांनी केलं.

काही वर्षांपूर्वी न्युझीलंडमध्ये एका शास्त्रज्ञाने संगीत, त्यामधून निघणारे वेगवेगळे नाद यांवर संशोधन केलं. नादलहरींमुळे वाळूचे कण वेगवेगळे आकार घेतात, पाण्यावर वेगवेगळे तरंग उमटतात, पाणी आपला प्रवाह बदलतं, आग प्रज्वलीत केली असता ज्योती वेगवेगळ्या आकार धारण करतात या घटनांचा समावेश असलेला एक व्हिडिओ त्या शास्त्रज्ञानी युट्युबवर प्रकाशित केला. तिथून नादयोगाबद्दल जगभरात बोललं जाऊ लागलं... नादयोग म्हणजे काय? तर ध्वनीचं, आवाजाचं शास्त्र म्हणजे नादयोग. आपल्या आजुबाजुला आपण खूप प्रकारचे ध्वनी ऐकत असतो. त्याचा उगम एकच असतो. सामवेदात आहत आणि अनाहत ध्वनींबद्दल सांगितलं आहे. कुठल्यातरी घर्षणांनी निर्माण झालेला आणि आपल्या कानाला ऐकू येणारा ध्वनी म्हणजे आहत ध्वनी तर कुठल्याही घर्षणांशिवाय निर्माण झालेला आणि आपल्या कानाला ऐकू न येणारा ध्वनी म्हणजे अनाहत ध्वनी असे ध्वनींचे दोन प्रकार स्मितातार्इंनी सांगितलं. नादयोगाच्या उगमाची रंजक कहाणी शंकराचार्यांच्या आनंद-लहरी या ग्रंथात आहे, ज्यात शिव-पार्वतीचं वर्णन केलं आहे.

नादाचे पाच ते सहा पैलू आहेत असं स्मितातार्इंनी सांगितलं. पहिला वाणी ज्यात परा, पश्चंती, मध्यमा आणि वैखरी यांचा समावेश होतो. गळा, तोंड, नाक आणि कान ही नादाची साधनं आहेत. ही नादाची साधनं आपल्या




आतील नादाला आपल्या आजुबाजुच्या वातावरणाशी जोडतात. दुसरा पैलू श्वास. शिवस्वरोदयशास्त्रात श्वासाचे प्रकार, नाडी, सोऽहं साधना यांबद्दल सांगितलं आहे. संगीत हा एक पैलू आहे. वेगवेगळे रस संगीतामध्ये आहेत ज्यामुळं रसनिर्मिती होते. शरिरातले कफ,वात,पित्त या दोषांची तीव्रता कमी करण्यासाठी संगीतशास्त्राचा वापर करता येतो. शरिरातल्या नादाच्या साधनांबरोबरच शंख,झांजा,तबला,पेटी या तालवाद्यांचा उपयोगही करता येतो. नादसिद्धी आणि आत्मोन्नती हे दोन पैलू म्हणजे नादयोगाचा खूप खोलात अभ्यास करून त्यांत अधिकारपदाला जाणं आणि त्याचा उपयोग समाजासाठी करणं.

नादयोग या खूप मोठ्या विषयाची प्राथमिक माहिती देणारं हे व्याख्यान खूपच रोचक होतं. कार्यक्रमाच्या शेवटी रो. अभिजित देशपांडे यांनी सौ. स्मिता सोवनी यांचं रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथतर्फे आभार मानले.

व्हिडिओ इथे पाहा...

➢ **क्लबच्या साप्ताहिक सभांचा सभेनुसार गोषवारा**

**साप्ताहिक सभा**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**एके / यामिनी पोंक्षे**

## *Innovation, Entrepreneurship - IPR Seminar*




Entrepreneurship Development Committee of RCPS organised a seminar on Innovation, Entrepreneurship, IPR Seminar for Army Institute of Technology on 13th March 2021.

<u>The seminar covered:</u>

-Awareness about Entrepreneurial and Start-up Journey

-Innovation

-Psychology of an entrepreneur

-Intellectual Property Rights

The Chief Guest of the event was President Rtn. Sudarshan Natu.

The opening address was given by Brig. Abhay Bhat (Retd.), Director AIT

**The expert speakers at the event were:**

| Name | Background | Topic |
|---|---|---|
| 1. Rtn Abhijit Deshpande | Co-Founder, Basiksense Technolgies Pvt. Ltd | Entrepreneurial Journey |

| Name | Background | Topic |
|---|---|---|
| 2. Mr. Vinit Kulkarni | Co-Founder, Greenovative Energy Solutions | Start-up journey: From Trader to Innovator |
| 3. Mr. Ashutosh Parasnis | An experienced Industry professional in leadership role for 35 years | Innovation Basics - Think Innovation |
| 4. Rtn. Anand Kulkarni | Founder, iTransformission | The Entrepreneur's Mindset |
| 5. Mr. Prafulla Wange | Team Bhate and Ponkshe | Introduction to Intellectual Property Rights |
| 6. Mr. Ajit Raul | Team Bhate and Ponkshe | The New age Tech Patents: Software, IOT etc. |

Thanks to Army Institute of Technology and Bhate & Ponkshe Associates for their valuable support.

This is first of many such events and Entrepreneurship Development Committee is planning to conduct sessions at various institutions soon.

## *Bon Voyage*



We all know about our past Rotaracter Mr. Adhik Kadam and his NGO, Borderless World Foundation and the mission he has undertaken.

Recently, he has been invited by some Army units in Kashmir which are running Army Goodwill Schools there. They want to handover those schools to civilian bodies. They found in Adhik

Kadam a reliable candidate for the task. Adhik needs someone to help him since it is a different task from what he has been engaged in till now.

He approached many Rotarians and discussed with them.

Our Rtn. PP. Dr. Sudhanshu Gore has volunteered to support him. Dr. Gore will go there, assess the situation and make a report in his first round.

He started on 18th March from Pune

We wish him success in this mission.

## सरस्वती विद्यालयाला भेट



सरस्वती विद्यालय आंबवणे या शाळेच्या व्यवस्थापनानं रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या अध्यक्षांना एक पत्र पाठवलं होतं त्यामध्ये शाळेमधल्या प्रयोगशाळेच्या दुरुस्ती आणि नुतनीकरण यांसाठी रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथनी मदत करावी असं आवाहन केलं होतं. १० मार्चला अध्यक्षांच्या परवानगीनं रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथचे चार सदस्य आंबवण्याला सरस्वती विद्यालयात गेले होते. त्याचबरोबर सर परशुरामभाऊ महाविद्यालयातल्या प्रयोगशाळा उभारण्याचा अनुभव असलेल्या डॉ. विद्या अवसरे यांना विशेष आमंत्रित केलं होतं. त्यांनी शाळेचे मुख्याध्यापक, विज्ञान शिक्षक आणि पर्यवेक्षक यांच्यासह शाळेच्या विविध वर्गांची पाहाणी केली. चांगल्या प्रयोगशाळेसाठी काय काय आवश्यक आहे याविषयी माहिती दिली. शाळेच्या विस्ताराच्या काही योजना आहेत त्या लक्षात घेऊन एका वर्गाची निवड केली. तिथे रसायनशास्त्र प्रयोगशाळा कशी उभारावी, भौतिकशास्त्राची आणि जीवशास्त्राची प्रयोगशाळा कुठे उभारणं सोयीचं ठरेल हे सांगितलं. त्याचवेळी रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथतर्फे देण्यात येणारे 'पिरिऑडिक टेबल' आणि 'हात धुण्याची योग्य पद्धत' हे तक्ते कुठे लावावेत याबाबत मुख्याध्यापक श्री. धनवट सरांनी त्यांच्या सहकार्यांना सूचना केल्या. सुमारे दोन तास चाललेल्या या उपक्रमाला संस्थेचे अध्यक्ष श्री. माउली आप्पा तळेकर आणि संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य श्री. पाठारे सर पूर्ण वेळ जातीनं उपस्थित होते याविषयी रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या सदस्यांनी आनंद व्यक्त केला. डॉ. अवसरे यांची विद्यार्थिनी कु. सिमरन हिने डॉ. अवसरे यांना या कामात मदत केली.

या कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथचे सदस्य रो. पीपी. राजाभाऊ येळनूरकर, एनइ. रो. रवींद्र प्रभुणे, रो. नितीन पाठक, आरसीसी चेअरमन आणि रो. सुधांशु गोरे उपस्थित होते. रो. रवींद्र प्रभुणे यांनी सर्वांसाठी सुग्रास भोजनाचं आयोजन केलं होतं.

# अंगणवाडी बालकांची आरोग्य तपासणी आणि सोया दूध सकस आहार योजना




करंजवणे प्राथमिक आरोग्य केंद्र इथे रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ आणि ज्ञान प्रबोधिनीच्या आरोग्य सखीतर्फे बालकांची आरोग्य तपासणी आणि सोया सकस दूध आहार योजना कार्यक्रम सुरू झाला. हा उपक्रम १७ मार्च २०२१ ते १५ जुलै २०२१ असा शंभर दिवस राबवण्यात येईल. बालरोगतज्ज्ञाकडून जवळपास एकशेवीस बालकांची तपासणी केली आणि त्यांचं आरोग्यकार्ड तयार केलं. त्यांना सोयाबीनपासून तयार केलेले दूध, लस्सी आणि ग्लुकोज बिस्किटं देण्यात आली. सर्व मुलांसाठी आणि पालकांसाठी जेवणाची सोय केली होती. बचतगटाच्या महिलांनी तयार केलेले सोया दूध आणि लस्सी हे पदार्थ खूप चविष्ट होते त्यामुळं श्री. रणजित पाल यांनी दिलेलं प्रशिक्षण यशस्वी झालं असं म्हणावं लागेल. हे प्रशिक्षण रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथनी अठरा जानेवारीला आयोजित केलं होतं. या प्रोजेक्टमध्ये अडवली, आसकवडी, मार्गासनी, खांबवडी ही गावं समाविष्ट केली आहेत.

गेले काही दिवस ज्ञान प्रबोधिनीतर्फे याची पूर्वतयारी चालू होती आणि त्यांनी अतिशय मेहनतीनं याचे आयोजन केलं होतं. डॉ. बागेश्री देवकर, वैद्य मेधा देवळेकर, डॉ. रेणुकुमार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तपासणी केली. प्राथमिक आरोग्यकेंद्राच्या डॉ. करपे यांनीही सहकार्य केलं. रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या सदस्यांनी या सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाला, प्रे. सुदर्शन नातू, फर्स्ट लेडी ॲन सुगंधा, पीपी रो. सुधांशु गोरे, ॲन अंजली देवधर, रो. अतुल अत्रे, रो. भाऊ सहस्त्रबुद्धे, रो. अरविंद शिराळकर उपस्थित होते.

# ‘विपीन गुजराथी’ सुंदर घरकुल स्पर्धा







‘विपीन गुजराथी’ सुंदर घरकुल स्पर्धेचा कार्यक्रम शनिवारी सत्तावीस मार्चला कुंबळे इथे संपन्न झाला. सकाळी आठच्या सुमारास रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथचे सदस्य खडकवासला इथे जमले आणि पुढे एकत्र पासलीला ‘पाऊलवाट फाउंडेशन’ इथे साडेदहाच्या सुमारास पोहोचले. तिथे ब्रेकफास्ट, चहा घेऊन दुपारी बारा वाजता रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथचे सदस्य कुंबळे गावात जमले. गावातल्या घरांचे परीक्षण करण्यासाठी आठ टीम्स तयार करण्यात आल्या. एका टीममध्ये दोन लेडी रोटेरिअन्स अशा टीम्स तयार केल्या होत्या. सर्व घरांचे परीक्षण दुपारी एक वाजेपर्यंत संपलं. तीन गावांतील एकूण ऐंशी घरं स्पर्धेत सहभागी झाली होती. सर्व परीक्षकांनी तासभर चर्चा करून विजेते निवडले. खूपच चुरस असल्यानं तीन विजेते आणि पाच उत्तेजनार्थ बक्षीसं देण्याचं ठरलं! गावातल्या महिलांनी तयार केलेल्या उत्कृष्ट भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर विजेत्यांना बक्षीस वितरणाचा आणि भेटवस्तू वितरणाचा कार्यक्रम झाला. गावकऱ्यांनी क्लबच्या सभासदांचं स्वागत आणि सत्कार केले. रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या अध्यक्षांनी रोटरीचं कार्य आणि सुंदर घरकुल स्पर्धा घेण्याचा उद्देश सांगितला त्यानंतर सर्व विजेत्यांना बक्षिसं, ट्रॉफीज् आणि सर्व गावकऱ्यांना स्टीलचे डबे आणि चटया भेट दिल्या. सर्व गावकरी खूप खूश होते यानंतर रो. दत्ताजींच्या



बहिणींनी दिलेलं हिरडा फोडायचं मशीन गावातल्या महिला गटाला देण्याचा कार्यक्रम झाला. सर्व गावकऱ्यांचा निरोप घेऊन रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथचे सदस्य कुंबळे इथून निघाले आणि संध्याकाळी साडेपाच वाजता सांगवीला रो. दत्ताजींच्या फार्मवर पोहोचले. संध्याकाळचा चहा घेऊन सदस्यांनी शेतात फेरफटका मारला. संध्याकाळी साडेसहाला चित्रपटगीतांची सुरेल मैफल जमली. अशा सुंदर कार्यक्रमानंतर तासभर फेलोशिप आणि गप्पा रंगल्या. रात्री रो. दत्ताजी, ॲन अंजली, केदार आणि सौ प्रज्ञा यांनी आयोजित केलेल्या सुग्रास जेवणाचा आस्वाद सदस्यांनी घेतला. रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथचे सुमारे पस्तीस सदस्य या कार्यक्रमाला उपस्थित होते. ॲन विजयाताईंनी उपस्थित राहून या प्रसंगी बहुमोल मार्गदर्शन केलं याबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त केलं. हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी रो. दत्ताजी, रो. सुधीर, रो. अभिजित, रो.प्रे. सुदर्शन, रो. विनोद, रो. संजीव, रो. निरंजन यांनी पुढाकार घेऊन मदत केली तसंच रो. संजीव, रो. निरंजन आणि रो. सुधीर यांनी फेलोशिप स्पॉन्सर केली होती.


- **अध्यक्ष सुदर्शन संवाद**
- **विविध विभाग संचालक किंवा कमिटी मुख्य संवाद**
- **क्लबमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम, फेलोशिप्स**
- **जावे त्यांच्या क्षेत्रा.../ मागील एखाद्या प्रोजेक्टची गोष्ट**

**तुमचा लेख आवर्जून द्या....**
**समन्वयक**
**आनंद / यामिनी**

**क्लबकारी**

# रोमन साम्राज्य – एक रक्तरंजित साम्राज्य

**रो. डॉ सुभाष देशपांडे**

ऐकण्यासाठी क्लीक करा...

इतिहासात तीन मोठी साम्राज्यं झाली जी हिंसा, रक्तपात, अमानुष कत्तल, स्त्रिया आणि असहाय्य जनतेवरच्या अत्याचारांवर आधारित होती. पहिलं चेंगीजखानाचं मोंगल साम्राज्य, दुसरं रोमन साम्राज्य आणि तिसरं मुघल साम्राज्य होय.

अशी आख्यायिका आहे की, रोम शहर रोम्यूलस आणि रिमस या जुळ्या भावांनी वसवलं. या भावांना लहानपणी एका लांडगीनं आपलं दूध पाजून जंगलामध्ये वाढवलं होतं. पुढे सत्तेच्या लालसेपोटी रोम्यूलसनं आपल्या सख्ख्या जुळ्या भावाची हत्या केली आणि अशा रितीनं रोमन साम्राज्याची सुरुवात रक्तपातानं झाली. ही घटना साधारणपणं दोन हजार सातशे सत्तर वर्षांपूर्वी घडली.

असंही सांगितलं जातं की, रोम्यूलस, रिमस यांच्या आधीपासून रोम शहराची स्थापना अनीस या योद्ध्यानं केली जो ट्रोजन युद्धातला एक पराजीत योद्धा होता. ट्रॉय शहर जे हल्लीच्या तुर्कस्तानाच्या उत्तरेला होतं तिथून त्यानं पलायन केलं आणि फिरत फिरत रोमच्या सात टेकड्यांच्या परिसरात आला. तिथं त्यानं आपली वसाहत स्थापन केली परंतु स्थानिक लोकांशी त्याचा झगडा झाला. अशारितीनं रोमन साम्राज्याची सुरुवात रक्तपातानं झाली. इतिहास आणि पुरातत्त्व शास्त्रानुसार रोम जवळपास तीन हजार वर्षांपूर्वी वसवलं.

रोमन साम्राज्य प्रथमतः राजे किंवा बादशाह चालवत असत. परंतु साधारणपणं अडीच हजार वर्षांपूर्वी रोमन साम्राज्यात क्रांती होऊन लोकशाहीची स्थापन झाली. जगातलं पहिलं लोकसत्ताक राज्य म्हणजे रोमन साम्राज्य असं म्हणायला हरकत नाही. निवडून आलेले अध्यक्ष, खासदार, आमदार तयार झाले आणि आपल्या देशाप्रमाणं एक राजकीय उमरावांचा समाज तयार झाला ज्यांनी रोमन साम्राज्यावर सत्ता गाजवायला सुरुवात केली. त्यावेळेस रोमन साम्राज्य हे एका शहराचं राज्य होते. साधारणपणं २५०० ते २३०० वर्षांपूर्वी रोमन राज्यानं विस्तार करायला सुरुवात केली. रोमन सैन्यानं ग्रीक सैन्याचा पराभव करून संपूर्ण इटलीवर प्रभुत्व मिळवलं. पुढच्या ५२ वर्षांत रोमन साम्राज्यानं संपूर्ण भुमध्य समुद्रावर कब्जा मिळवला. २२८४ वर्षांपूर्वी उत्तर आफ्रिकेतल्या सध्याच्या लेबनान देशातल्या पूर्वीच्या 'कार्थेज' या राज्याशी रोमन नौदलानं आणि पायदळानं वीस वर्षं लढून सिसीली हे बेट ताब्यात घेतलं.

२२३८ ते २२२१ वर्षांपूर्वी कार्थेजचा राजा हनीबालनं स्पेनच्या बाजुनं आल्पस् पर्वत ओलांडून त्याच्याकडचे हत्ती आणि एक लाख सैन्यासह रोमन साम्राज्यावर आक्रमण केलं. लहानपणी आपण इतिहासात हनीबालनं हत्तींसह आल्पस् पर्वत ओलाडल्याचं वाचलं असेल. तोच हा राजा हनीबाल. त्यानं 'कॅनी' या जागी ४५,५०० रोमन सैनिक आणि २,७०० घोडेस्वार ठार करून रोमन सैन्याचा पराभव केला. चौदा वर्षांनी उत्तर आफ्रिकेतल्या 'झामा' इथे रोमन सैन्य परत हनीबालच्या सैन्याला भिडलं आणि २०,००० सैनिकांना ठार करून हनीबालच्या सैन्याचा पराभव केला. २,१७३ वर्षांपूर्वी रोमन साम्राज्याचं लक्ष पूर्वेकडं गेलं. हल्लीच्या ग्रीसमधल्या 'पिडना' इथे ग्रीक सैन्याचा पराभव करून रोमन सैन्यानं २०,००० सैनिकांची कत्तल केली आणि ११,००० सैनिक कैद केले.

२,१६८ वर्षांपूर्वी तिसरं कार्थेज युद्ध सुरू झालं. कार्थेज शहरात प्रवेश करायला दोन वर्षं लागली. सलग सहा दिवस युद्ध सुरू होतं. सातव्या दिवशी कार्थेजमध्ये कत्तल सुरू झाली. पुरूष, स्त्रिया, मुलं कुणालाही रोमन सैन्यानं सोडलं नाही. पन्नास हजार माणसं मारली गेली. उरलेली पन्नास हजार माणसं गुलाम म्हणून विकली गेली. संपूर्ण शहर उध्वस्त केलं गेलं. क्रूरतेचा इतका कळस गाठला गेला की, रोमन सैन्याचा सेनाप्रमुख इमिलॅनस उद्गारला, 'एक दिवस रोमसुद्धा असंच नष्ट होईल'.

२,०८० वर्षांपूर्वी रोमन साम्राज्यात ज्युलियस सिझर उदयास आला. तो रोमच्या एका खानदानी कुटुंबातला

सदस्य होता. ज्युलियस सिझर रोमन साम्राज्याचा अध्यक्ष म्हणून निवडून आला. पुढची सात वर्षं सिझरचं सैन्य फ्रान्समधल्या गॉल जमाती विरुद्ध लढलं. चार लाख गॉल सैनिकांचा सीझरनं पाडाव केला. तसं करताना त्यानं ऱ्हाईन नदीवर एक पूल बांधला. हा पूल त्या काळातल्या स्थापत्यशास्त्रातलं एक आश्चर्य होतं. एक वर्षानं गॉल जमातीनं परत उठाव केला. त्या लढाईत दहा लाख लोक मारले गेले असं मानतात. ही अतिशयोक्ती असावी.

आता सिझरची महत्त्वाकांक्षा वाढली होती. रोमन साम्राज्य प्रजासत्ताक होतं. सिझरला त्या साम्राज्याचा सत्ताधीश व्हायचं होतं. रोममधल्या सिनेटरांचा त्याला विरोध होता तेव्हा सीझरनं रोमवर हल्ला केला. वाटेतली सर्व शहरं त्याला शरण गेली. रोमचा अध्यक्ष पॉम्पोचा पराभव करून सिझरनी रोम ताब्यात घेतलं त्यानंतर चार वर्षांनी तो रोमन साम्राज्याचा सम्राट बनला. मार्च महिन्यात रोमच्या लोकसभेत सिझरची हत्या करण्यात आली. ही रोमच्या इतिहासात झालेली दुसऱ्या सत्ताधीशाची हत्या होय.

सीझरच्या हत्येनंतर अठरा वर्षं रोमन साम्राज्यात आपापसात रक्तपात होत राहिला. ज्युलियस सिझरचा मानसपुत्र ऑक्टोव्हीअसनं सिझरच्या हत्येचा बदला घेण्यासाठी एका वर्षात यादवी युद्ध सुरू केलं त्यासाठी त्यानं सिझरचा राजकीय मित्र मार्क अंटोनीची मदत घेतली. साधारणपणं तीनशे सिनेटर आणि दोन हजार सरदारांची हत्या करण्यात आली. एका वर्षात सिझरचा मारेकरी ब्रुटसला मारण्यात आलं. दोन हजार एकावन्न वर्षांपूर्वी दोन सप्टेंबरला ग्रीसमधल्या ॲक्टीअम इथे पूर्वीचे मित्र ऑक्टोव्हीयस् आणि मार्क अंटोनी यांच्यात नौदल युद्ध झालं. इजिप्तची राणी क्लिओपात्रा जी पूर्वी सिझरची प्रेयसी होती, तिने मार्क अंटोनीला या युद्धात मदत केली. त्या युद्धात मार्क अंटोनी आणि क्लिओपात्राचा पराभव झाला. आपल्या नावा बरोबर घेऊन क्लिओपात्रा सागरी युद्धभूमीवरून निसटली. ऑक्टोव्हीअसनी इजिप्तवर ताबा मिळवला. क्लिओपात्रा आणि मार्क अंटोनी या दोघांनी आत्महत्या केली. २०३९ वर्षांपूर्वी ऑक्टोव्हीअस् रोमन साम्राज्याचा सम्राट झाला आणि सिनेटला दुय्यम स्थान प्राप्त झालं. ऑक्टोव्हीअसनं स्वत:चं नाव बदलून ऑगस्टस् असं ठेवलं. बादशहा ऑगस्टसच्या काळात रोमन साम्राज्यात सुबत्ता आणि शांती नांदली. २०३४ वर्षांपूर्वी ऑगस्टस् मृत्यू पावला. त्यानं चाळीस वर्षं राज्य केलं.

(क्रमशः)

## सोनचाफा

**ॲन मोहिनी नातू**

पाकळी दळदार अति
तेजस्वी असे कांती...
सुगंध निर्मख हा
दरवळे आसमंती...!

डौलात असे हे
फांदीवरी विराजे...
दिमाख त्याचा
त्यालाच किती साजे...!



योगियांचे असे हे
फूल अति लाडके...
अंगणात फुलता
आनंद आज बहरे...!

## *Artwork*

Ann Dr. Geetanjali Purohit



- सभासदांचा सहभाग वाढावा हा हेतू
- सभासदांच्या कलागुणांना वाव
- चित्रकला, फोटोग्राफी, कथा, लेख, कविता
- व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक गवसणी


**कलाकारी**

तुमचा लेख आवर्जून द्या....
समन्वयक
आनंद कुलकर्णी / यामिनी पोंक्षे

# रंगुनी रंगात साऱ्या...
# राजेश ठोंबरे सखा वन्यजीवांचा

**रो.योगेंद्र नातू**

ऐकण्यासाठी क्लीक करा...




जळगाव जिल्ह्यातलं चाळीसगाव माहीत आहे का? इथली दोन माणसं प्रसिद्ध आहेत. त्यांतले एक आहेत केकी मूस नावाचे पारशी चित्रकार... ते आता हयात नाहीत... त्यांचं वैशिष्ट्य असं होतं की, ते आयुष्यभर गावच काय, घरसुद्धा सोडून कधी बाहेर गेले नाहीत आणि दुसरा राजेश ठोंबरे नावाचा मुलगा जो कधी घरात राहतच नाही. जणू काही गुगलच आणि करतो काय तर लोकांची सेवा आणि ती कशी? ते या 'रंगुनी रंगात साऱ्या' पुस्तकात कळतं. त्यानं सांगितलेली सर्व चित्तथरारक माहिती मृणालिनी चितळे यांनी तितक्याच रंजकपणं शब्दबद्ध केली आहे.

खेड्यात राहणाऱ्या लोकांना सर्वसामान्यपणं सर्पदंश, जंगली जनावरांचा त्रास होतो... मग सापाच्या चावण्यावर औषध कसं शोधता येईल? पीडित माणसाला लवकरात लवकर औषधोपचार कसा मिळेल? यासाठी राजेश खूप धावपळ करतो. पाल विषारी नसते हे सिद्ध करण्यासाठी त्यानी केलेले प्रयोग वाचण्यासारखे आहेत. पाल विषारी असल्याचा गैरसमज दूर करण्यासाठी त्याला जे.सी.डॅनियल लिखित 'इंडियन रेपटाइल्स' या पुस्तकाची खूप मदत झाली...

एकदा एका गावातून बिबट्या बकरी, कुत्रं, किंवा छोटे मूल उचलून नेत होता. राजेशकडे तक्रार आली... यांनी पाहणी केली तेव्हा एक अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट लक्षात आली. बिबट्यानं एका बाईच्या मानेला धरलं होतं पण उचलून मात्र नेलं नाही कारण काय तर त्या बाईनी स्वतःच्या मानेभोवती कापड गुंडाळलं होतं. पुढे अनेक वेळा हे लक्षात आलं आणि आता अशा नरभक्षक जनावराला हुसकवायचं असेल तर राजेश स्वतः पुढे होतो पण मानेला मफलर किंवा तत्सम कापड गुंडाळूनच... मौल्यवान वृक्षाच्या लाकडाची होणारी चोरी थांबविण्याकरता, चोरांना पकडून देण्याकरता राजेश जीवावर उदार होऊन मदत करतो त्यासाठी स्वतः शिकवून प्रशिक्षित केलेली कुत्रीसुद्धा बरोबर घेऊन जातो. आता शासनानं त्याची 'मानद उपवनाधिकारी' अशी सन्मान्य नेमणूक केली आहे... त्याच्या कार्याचा यथोचित गौरव... सर्पदंश, नरभक्षक हल्ला या सर्व प्रसंगांचा त्या त्या वेळी केलेल्या उपायांचा आणि माहितीचा त्याच्याकडे इतका मोठा साठा जमा झाला होता की, त्यावर पाच-सहा डॉक्टरेट प्रबंध नक्की तयार झाले असते. त्याच्या या सर्व कामगिरीमुळं तिथल्या डॉक्टरांना 'स्वतःच्या पोटावर पाय येईल की काय' अशी भीती वाटू लागली... कारण मुळात राजेशनी लोकांच्या मनातला गैरसमज दूर करून भीती कमी करण्याचा प्रयत्न केला होता. शिवाय स्थानिक औषधोपचार करून लोकांना मदत करत होता त्यामुळे एका डॉक्टरांनी त्याला अशी भीती घातली की 'तुझ्यावर पोलीस तू बोगस डॉक्टर असल्याची केस करून तुला तुरुंगात टाकू शकतात'आणि मग ही भीती घालून त्यानी जमा केलेल्या माहितीचा सर्व साठा त्याला जाळून टाकायला लावला. तऱ्हेतऱ्हेच्या प्रसंगांना सामोरे जात, वेळप्रसंगी घरात उद्या काय शिजेल याचा विचार न करता राजेश ठोंबरेचं म्हणजे सखा वन्यजीवांचा याचं काम चालू आहे. ही सर्व कथा लेखिकेनी अतिशय नाट्यमयतेनं लिहिली आहे कारण अशा दोनतीन साहस सफरींवर त्या स्वतःसुद्धा राजेशबरोबर जाऊन आलेल्या आहेत. एकदा हातात धरलेलं हे पुस्तक वाचून पूर्ण केल्याशिवाय खाली ठेववत नाही.

'रंगुनी रंगात साऱ्या' राजेश ठोंबरे सखा वन्यजीवांचा, शब्दांकन - मृणालिनी चितळे
राजहंस प्रकाशन, पृष्ठ - २५६, किंमत - रू.३२०/-

- **सभासदांचा वेगवेगळ्या विषयांवरचे दृष्टिकोन मांडण्याची जागा...**
- **हलकंफुलकं लेखन हवं**
- **पुस्तंक, नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरीज**
- **राजकारण, समाजकारण, चालू घडामोडी**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे**

**दृष्टिकोन**

विशेष

# Polio Fund Certificate


2019-20

The Rotary Foundation

Rotary Club of Pune South

is presented a certificate of appreciation for its financial support of End Polio Now: Countdown to History Campaign. Together, we will fulfill our promise to the children of the world and eradicate polio.

END POLIO NOW

Gary C.K. Huang
Chair, The Rotary Foundation Trustees

Mark Daniel Maloney
President, Rotary International

## पिरिऑडीक टेबल डोनेशन

रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ तर्फे नूतन बालविकास मंदिर शाळेत मॉडर्न पेरिओडिक टेबलची देणगी दिली गेली. याकरता ॲन स्नेहा ओगले यांनी देणगी दिली होती.

ॲन स्नेहा आणि रो. संजीव ओगले यांना धन्यवाद.





## पिरिऑडीक टेबल डोनेशन





## विशेष

- शुभेच्छा
- स्मृती
- गवसणी
- या महिन्यात मागच्या वर्षांत...

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
श्वेता करंदीकर

## टीम बुलेटिन

### सदरं

- मुखपृष्ठ ..........................श्वेता.............. विधानं/ कोट्स
- संपादकीय/ अध्यक्षीय........योगेश /सुदर्शन
- रोटरी..........................योगेंद्र / अभिजित............... रोटरी मंच/RI
- डिस्ट्रिक कनेक्ट...........योगेंद्र / अभिजित........ डिस्ट्रिक घडामोडी
- क्लबकारी.........................आनंद / यामिनी..........क्लब घडामोडी
- कलाकारी........................आनंद / यामिनी..........सभासद गुणदर्शन
- दृष्टीकोन.......................योगेंद्र / अभिजित..........पुस्तक, चित्रपट इ.
- विशेष.............................श्वेता....................शुभेच्छा, स्मृती
- क्रिएटिव्ह असिस्टन्स आणि कोऑर्डिनेशन..........टीम सहयोगी